## कळंबोली वसाहतीमधील खडडेमय रस्त्यांबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांचा तारांकित प्रश्न

नागपूर (प्रतिनिधी) पावसाळयात व पावसाळयानंतरही डांबरीकरण करूनसुध्दा कळंबोली वसाहतीतील रस्त्यांची दयनिय अवस्था व मोठमोठाले खडडे याबाबत संबंधित ठेकेदार यांची सखोल चौकशी व्हावी असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात उपस्थित केला होता. हा तारांकित प्रश्न सखोल चर्चेसाठी राखून ठेवण्यात यावा अशी विनंती आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभापती यांच्याकडे केली. त्याप्रमाणे हा प्रश्न विधानसेभेचे सभापती दिलीप वळसे-पाटील यांनी सखोल चर्चा व उपाययोजनेसाठी राखून ठेवला आहे.

रायगड जिल्हयातील पनवेलजवळील कळंबोली वसाहतीतील रस्त्यांवर पावसाळयापूर्वी डांबरीकरण करण्यात आलेले असतानाही या रस्त्याचे ठेकेदाराकडून झालेल्या निकृष्ट कामामुळे रस्त्यात खड्डयांचे साम्राज्य पसरल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी व हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिवेशनात उपस्थित केला होता. या विषयावर विस्तृत चर्चा व्हावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेली विनंती ग्राहय धरून त्यांच्या विनंतीनुसार हा प्रश्न विधानसेभेचे सभापती दिलीप वळसे-पाटील यांनी सखोल चर्चा व उपाययोजनेसाठी राखून ठेवला आहे.

## विदर्भ अतिवृष्टीतील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळाल्याबाबत

नागपूर (प्रतिनिधी) राज्यात विशेषतः विदर्भातील अतिवृष्टीग्रस्तांसाठी १९३४ कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर करूनही नुकसानीचे सर्व्हेक्षण पूर्ण न झाल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळाल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या अधिवेशनात तारांकीत प्रश्न दाखल केला होता.

राज्यात विशेषतः विदर्भात अतिवृष्टी ग्रस्तांसाठी मुख्यमंत्र्यांनी १९३४ कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर केले असले तरीही विदर्भातील नुकसानीचे सर्व्हेक्षण करण्याचे काम दिनांक १५ ऑगस्ट २०१३ ची मुदत संपल्यानंतरही पूर्ण झाले नसल्याने तसेच सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून यवतमाळ जिल्ह्यात पुन्हा शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरू झाले असून मागील ३ महिन्यात (ऑक्टोबर २०१३ अखेर पर्यंत) २३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे विदर्भ जनआंदोलन समितीने मा. मुख्यमंत्र्यांकडे सादर केलेल्या निवेदनातून निदर्शनास आले आहे. शासनाने घोषित केलेल्या २ हजार कोटीच्या मदतीमधून शेतकऱ्यांना काहीही मदत मिळाली नसल्याने त्यांच्यावर झालेले कर्ज फेडण्यास शेतकरी असमर्थ असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, काय तसेच पूरग्रस्त भागातील शेतांच्या नुकसानीचे अहवाल अद्यापी सरकारपर्यंत पोहचले नसल्याने अर्थ मंत्रालयाने निधी देण्यास असमर्थता दर्शविली आहे, ही बाब खरी आहे काय, राज्य शासनाने राज्यातील विशेषतः विदर्भातील अतिवृष्टीतग्रस्तांसाठी केंद्र शासनाकडून मदत मिळावी म्हणून एक प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केला असून शासनाने संपूर्ण विदर्भातील कोणतीही अट न लावता सरसकट सर्व शेतकऱ्यांना १0 हजार कोटीची मदत मिळावी अशी मागणी विदर्भ जनआंदोलन समितीच्या नेत्यांनी केली, आहे का, त्याचप्रमाणे या प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने शासनाने शेतकऱ्यांसाठी घोषित केलेली मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास दिरंगाई व टाळाटाळ करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, अशीही दाखल केलेल्या तारांकित प्रश्नाव्दारे विचारणा अधिवेशनात केली.

पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे की, राज्यातील अतिवृष्टीसाठी झालेल्या नुकसानीचे सर्व्हेक्षणाचे काम जवळपास पूर्ण झाले असून, यवतमाळ जिल्ह्यात झालेल्या आत्महत्याबाबतची बाब अंशतः खरी आहे. शासनाने घोषित केलेल्या २ हजार कोटीच्या मदतीमधून शेतकऱ्यांना काहीही मदत मिळाली नसल्याने त्यांच्यावर झालेले कर्ज फेडण्यास शेतकरी असमर्थ असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब खरी नसून विदर्भातील अतिवृष्टीतग्रस्तांसाठी केंद्र शासनाकडून मदत मिळावी म्हणून एक प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर झाला आहे.

# राज्यात चोरी छुप्या पध्दतीने गुटखा विक्री होत असल्याबाबत

नागपूर (प्रतिनिधी) राज्यात गुटखाबंदी झाल्यानंतरही चोरीछुप्या पध्दतीने गुटखा विक्री सुरू असल्याचे ऑगस्ट २०१३ च्या सुमारास निदर्शनास आले असून रायगड जिल्ह्यातील माणगाव येथील मून पॅलेस बाजूला मोर्चा रोड येथे सप्टेंबर २०१३ मध्ये २ कोटीहून अधिक रक्कमेचा गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला आहे, तसेच हिंगोली शहराच्या मध्य वस्तीमध्ये गुटख्याचा कारखाना सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच नांदेड पासून जवळच असलेल्या धानेगांव येथील पुनाजी भालके यांच्या शेतात टनि शेड उभारून बनावट गुटख्याचा कारखाना उभारला जात असतांना दिनांक ६ सप्टेंबर २०१३ रोजी अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी प्रविण काळे यांनी धाड टाकून १ कोटीची यंत्रे जप्त केली तसेच गुजरात व दिल्ली येथून महाराष्ट्रात गुटखा मागविण्यात आल्याचे आणि रास्ता पेठ (पुणे) परिसरातही बंदी घालण्यात आलेल्या गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला आहे. प्रकरणी चौकशी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व संबंधित बेकायदा गुटखा विकणाऱ्यांवर तसेच अनधिकृतपणे गुटखा कारखाना सुरू ठेवणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

अन्न व औषधे प्रशासन मंत्री मनोहर नाईक यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे की, रायगड जिल्ह्यातील माणगाव येथील मून पॅलेस बाजूला मोर्चा रोड येथे सप्टेंबर २०१३ मध्ये २ कोटीहून अधिक रक्कमेचा गुटख्याचा साठा जप्त करण्यात आल्याची बाब खरी असून रायगड जिल्ह्यातील माणगांव येथे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पोलीसांसमवेत कारवाई करून रू.२,३२,५०,५००/- एवढा किंमतीचा प्रतिबंधित गुटखा, कच्चा माल पॅकेजिंग साहित्यासह जप्त करून तो नष्ट केला आहे. यातील संबंधित ३७ दोषी व्यक्तींविरूध्द माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणी तपास करण्यात येत आहे. त्याचबरोबर हिंगोली शहरात दिनांक २८ऑगस्ट २०१३ रोजी धाड टाकून गुटखा तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल व मशिनरीसह एकूण रू.५०,७०,२६१/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करून संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू आहे. नांदेड कार्यक्षेत्रातील पुनाची भालके यांच्या शेतात टीन शेड उभारून बनावट गुटख्याचा कारखाना उभारला जात असताना दि.६ सप्टेंबर २०१३ रोजी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी धाड टाकून एकूण रू.२५,५४,६००/- एवढया किंमतीचा गुटखा बनविण्याचा मुद्देमाल जप्त करून संबंधित आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. रास्तापेठ पुणे परिसरात सतीश आहुजा यांच्या गोदामात छुप्या पध्दतीने साठविलेला रू.९,६४,८५०/- इतक्या किंमतीचा प्रतिबंधित गुटख्याचा साठा धाड टाकून जप्त केला आहे, संबंधित व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ व नियमन २०११ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

# अनैतिक व्यवसायाबाबत

नागपूर (प्रतिनिधी) ठाणे जिल्हयातील कळंब-राजोडी या समुद्रकिनारी भागातील रिसॉर्टसच्या माध्यमातून अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची तक्रार अर्नाळा सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील महिलांनी जिल्हा प्रमुख पोलिस (सागरी पोलिस), मा. गृह मंत्री यांच्याकडे ऑगस्ट २०१३ मध्ये केली आहे, अनैतिक गैरप्रकाराला पायबंद घालण्यासाठी शासनस्तरावरून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच या प्रकरणी चौकशी करून संबंधितांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

गृह मंत्री आर.आर.पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले आहे की, कळंब-राजोडी या समुद्रकिनारी भागातील रिसॉर्टसच्या माध्यमातून अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची तक्रार अर्नाळा सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील महिलांनी जिल्हा प्रमुख पोलिस (सागरी पोलिस), मा. गृह मंत्री यांच्याकडे केल्याचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नसून अनैतिक प्रकाराला पायबंद घालण्यासाठी अर्नाळा पोलिसांनी सन २०१३ मध्ये मुंबई पोलिस ॲक्ट ११०, ११२, ११७ नुसार ३० केसेस असून ३३ (डब्लु) प्रमाणे ५९ केसेस करण्यात आलेल्या आहेत. तसेच अर्नाळा, कळंब, राजोडी परिसरातील हॉटेल, लॉजेस, रिसोर्ट व फार्म

हाऊसवर कारवाई करणेबाबत तहसिलदार, वसई, उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी, उपविभागीय दंडाधिकारी, वसई गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वसई, मा.आयुक्त, वसई - विरार महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त व अन्न व औषधी प्रशासन विभाग ठाणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच संबंधित पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांना सदर परिसरातील हॉटेल, लॉजेस, फार्म हाऊस, गेस्ट हाऊस यांची वेळोवेळी तपासणी करून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

## मुंबई शहरात सी.सी.टी.व्ही.यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

नागपूर(प्रतिनिधी)मुंबईत महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही.यंत्रणा कार्यान्वित करण्यासंदर्भात निविदाकराबरोबर करारनाम्याच्या कार्यवाहीसह बुलेटप्रुफ जॅकेटच्या खरेदीसाठीच्या निविदाप्रक्रिया बाबतची कार्यवाही अंतीम टप्प्यात असून साधारणतः केव्हापर्यंत सी.सी.टी.व्ही. यंत्रणा महत्वाच्या ठिकाणी कार्यान्वित करण्यासह बुलेटप्रुफ जॅकेट मिळणे अपेक्षित आहे. तसेच याबाबची सदयस्थिती काय आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर अधिवेशनात दाखल केला होता.

मुंबई शहरात सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यासंदर्भात फेरनिविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरू आहे. तसेच बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्याकरिता सन २०१२-१३ मध्ये निविदा प्रक्रिया राबविण्यात आली ती पुर्ण झाली असून मे.नेको डिफेन्स सिस्टीम, नागपुर या कंपनीला ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याकरिता दि.२०.११.२०१३ नुसार आदेश देण्यात आले. या कंपनीने कस्टम डयुटी प्रमाणपत्राची पुर्तता झाल्यावर किमान ४५ दिवसात बुलेटप्रुफ जॅकेटचा पुरवठा करणे अपेक्षित आहे, असे लेखी उत्तर गृह मंत्री आर.आर.पाटील यांनी दिले आहे.